रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,मंचर

फॉर्म नं १७ संदर्भात महत्वाचे नोटीस

फेब्रुवारी/ मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या इ. १२ वी परीक्षेसाठी फॉर्म नं. १७ भरू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील पदधतीने व दिलेल्या तारखांनाच नाव नोंदणी अर्ज http://form17.mh-hsc.ac.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावा. तसेच फी ऑनलाईन (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking) व्दारे भरावी. मुदतीनंतर व ऑफलाईन पदधतीने फॉर्म भरता येणार नाही याची नोंद घ्यावी.

नावनोंदणी अर्ज भरण्याच्या तारखा

अ.क्र	फॉर्म भरण्याचा दिनांक	तपशील
१	गुरुवार दिनांक १०/०८/२०२४ ते मंगळवार दिनांक ११/०९/२०२४	विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी व शुल्क ऑनलाईन भरणे.
२	शुक्रवार दिनांक १२/०८/२०२४ ते गुरुवार दिनांक ११/०९/२०२४	विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन शुल्क भरलेली पोच पावतीच्या दोन झेरॉक्स प्रती व मूळ कागदपत्रे, व कागदपत्राच्या दोन प्रती झेरॉक्स अर्जावर नमूद केलेल्या महाविद्यालयामध्ये जमा करणे.

महत्वाच्या सूचना :–

१. विद्यार्थ्यांनी अर्ज महाविद्यालयात जमा करताना खालील कागदपत्रे अर्जासोबत जोडावी.
२. मुळ अर्ज, ऑनलाईन शुल्क भरलेली पावती २ प्रती झेरॉक्स
३. इ. १० वी शाळा सोडल्याचा दाखला ओरिजनल व २ प्रती झेरॉक्स
४. शाळा सोडल्याचा दाखला डुप्लीकेट असल्यास प्रतिज्ञापत्रामध्ये मागील दोन वर्षात नियमित विद्यार्थी म्हणून कुठेही प्रवेश घेतलेला नाही असा उल्लेख करून कोर्ट फीसह (AFFIDAVIT) सादर करावे. प्रत्येक खाजगी विद्यार्थ्यांने हमीपत्र २ प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. हमीपत्र व प्रतिज्ञापत्राचा नमुना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर (aacmanchar.com) उपलब्ध आहे.
५. इ. १० वी गुणपत्रक ओरिजनल व २ प्रती झेरॉक्स
६. इ. १० वी प्रमाणपत्र ओरिजनल व २ प्रती झेरॉक्स,
७. आधारकार्ड २ प्रती झेरॉक्स,
८. गॅप असल्यास गॅप सर्टिफिकिट ओरिजनल व २ प्रती झेरॉक्स
९. ही प्रक्रिया फक्त खाजगीरित्या नावनोंदणीची असून विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म स्वंतत्रपणे भरणे आवश्यक आहे.
१०. फॉर्म संदर्भात काही अडचण असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा. (श्री. टेमकर एम.एस. 9604949198)

नावनोंदणी अर्ज करावयाची वेबसाईट

http://form17.mh-hsc.ac.in

प्र.प्राचार्य
अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स
हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज

Scanned with OKEN Scanner

Duplicate T.C. संदर्भातील प्रपत्र क्र. 2.

प्रपत्र क्र.२

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) न जोडता दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास कोर्ट फी रु. १०० /- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर कार्यकारी दंडाधिकारी/ शासन नियुक्त नोटरी समोर तयार करावयाच्या प्रतिज्ञा पत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

मी (विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव)----------
श्री.---------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी
वय ---------- वर्ष व्यवसाय (धंदा) ----------राहणार----------
सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की,

मी सन ---------- पासून----------पर्यंत ----------

या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात शिकत होतो/ होते. मी दिनांक ---------- रोजी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सोडली/सोडले आहे.

वर नमूद केलेल्या शाळेकडून/कनिष्ठ महाविद्यालयाकडून मला शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) मिळालेला होता. परंतु सदर दाखला मी फॉर्म नं. १७ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगी मिळविण्यासाठी सादर करू शकत नाही कारण -

(सूचना:- प्रतिज्ञापत्र मूळ दाखला का सादर करू शकत नाही, याचे कारण स्पष्ट व अचूक नमूद करावे.)

---------- वर नमूद केलेल्या तारखेनंतर मी नियमित विद्यार्थी म्हणून कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेला नाही.

वरील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.(मा. कार्यकारी दंडाधिकारी/शासन नियुक्त नोटरी यांच्या समोर स्वाक्षरी करीत आहे)

विद्यार्थी/ विद्यार्थीनी स्वाक्षरी----------

(माझ्या समक्ष) संपूर्ण नाव :-
(मा. कार्यकारी दंडाधिकारी/शासन नियुक्त नोटरी यांची स्वाक्षरी व शिक्का)

ठिकाण :-
दिनांक :-

सूचना : प्रतिज्ञापत्रात मूळ दाखला का सादर करू शकत नाही, याचे कारण स्पष्ट व अचूक नमूद करावे.

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र क्र.१

खाजगीरीतीने प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्याने भरून द्यावयाचे हमीपत्र

1. मी विद्यार्थी/विद्यार्थीनी ----------

यापूर्वी कधीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेली उच्च माध्यमिक प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही सांविधानिक मंडळ किंवा विद्यापीठ यांच्या इतर कोणत्याही समतुल्य परीक्षेस प्रविष्ट झालो/ झाले नाही किंवा उच्च परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही.

2. मी सादर केलेला फॉर्म नं.१७ हा फक्त मी इ.१२ वी परीक्षेस बसण्यास पात्र आहे किंवा नाही यासाठी भरलेला आहे, याची मला पूर्ण जाणीव व माहिती आहे. मंडळाने मला पात्र ठरविल्याची माहिती मी स्वत: समक्ष माझ्या उच्च माध्यमिक शाळेकडून/कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेईन व परीक्षेसाठी फॉर्म भरून देईन. अशाप्रकारे मी पात्र ठरून जर परीक्षेचा फॉर्म भरू शकलो/शकले नाही, तर त्या संबंधीची संपूर्ण जबाबदारी माझी राहील व त्याबद्दल मी कोणतीही तक्रार करणार नाही.

नोंदणी अर्ज क्र.----------

विद्यार्थ्याचा/विद्यार्थीनीचा पत्ता : ----------

विद्यार्थ्याची/विद्यार्थीनीची स्वाक्षरी----------

स्थळ :----------

मुख्याध्यापक/प्राचार्य (स्वाक्षरी)
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टीप :- सदर हमीपत्र विद्यार्थ्याकडून दोन प्रतीत भरून घ्यावे. एक प्रत फॉर्म नं. १७ सोबत मंडळास पाठवावी व एक प्रत मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या अभिलेखात जतन करून ठेवावी.

Scanned with OKEN Scanner